| वर्ष - 7 । अंक - 141 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM) टिपरी

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 26 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पात्र उमेदवारांना 'वेटिंग'!

## » अंतिम यादीची प्रतीक्षा : पिंपरी-चिंचवड महापालिकेची नोकर भरती

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या वतीने घेण्यात आलेल्या नोकरभरती परीक्षेतील उत्तीर्ण उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी केली जात आहे. त्यानंतर आरक्षणासह पात्र उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. पुढील महिन्यात १४ तारखेपर्यंत सर्व ३६८ उमेदवारांना विविध पदांवर रूजू करून घेण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे.**




> दुसऱ्या टप्प्यातील नोकरी भरतीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची यादी महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. आरक्षणानुसार पात्र उमेदवारांची कागदपत्रे तपासणीचे काम सध्या सुरु आहे. ती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर समिती समोर अहवाल देऊन पात्र उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात येईल.
>
> **– विठ्ठल जोशी,**
> **उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग.**

महापालिकेच्या वेगवेगळ्या १५ पदांसाठी ३६८ जागांसाठी मेमध्ये तीन दिवस राज्यभरातील विविध केंद्रांवर ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली. त्यात प्रत्यक्षात ५५ हजार जणांनी परीक्षा दिली. परीक्षेनंतर ११ पदांसाठी ३५ जागांचा निकाल ७ ऑगस्टला जाहीर करण्यात आला. त्यात अतिरिक्त कायदा सल्लागार, विधी अधिकारी, उपमुख्य अग्निशमन अधिकारी, विभागीय अग्निशमन अधिकारी, उद्यान निरीक्षक (वृक्ष), उद्यान निरीक्षक, हॉर्टिकल्चर सुपरवायझर, कोर्ट लिपिक, ॲनिमल किपर, समाजसेवक, आरोग्य निरीक्षक या पदांचा समावेश होता. लिपिक, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (विद्युत), स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या चार पदांसाठी तब्बल ३० हजार ५८१ अर्जदार परीक्षेला बसले होते.

त्यांचा निकाल ३० ऑगस्टला जाहीर करण्यात आला. दरम्यान, पहिल्या टप्प्यातील निकाल प्रसिद्ध करून आरक्षणासह यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. पात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाली आहे. दुसऱ्या य टप्प्यातील पात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी सुरू आहे. त्यानंतर नियुक्तिपत्र देऊन त्यांना कामावर रूजू करून घेण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.

# श्रीगणेश विसर्जनासाठी विसर्जन मार्गावरील अडथळे दूर करा!

## » आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या सर्व क्षेत्रिय कार्यालियांना सूचना

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार सर्व क्षेत्रिय कार्यालयात करण्यात येते. सभेचे अध्यक्ष तथा मुख्य समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेल्या मनपा क्षेत्रीय कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांना महापालिकेच्या अनुषंगाने असलेली कामे, अडचणी, तक्रारी, सूचना या सर्व बाबींची नोंद घेऊन संबधितांना या बाबतीत कार्यवाही करण्याच्या सूचना महापालिकेकडून दिल्या गेल्या आहेत.**



### क्षेत्रीय कार्यालय निहाय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

» नागरिकांशी सुसंवाद साधणे, तक्रारींचे निराकरण करणे आणि प्रशासकीय निर्णयांमध्ये तसेच होणाऱ्या विकासकामांमध्ये नागरिकांच्या समस्यां दूर व्हाव्यात यासाठी क्षेत्रिय कार्यालयनिहाय जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येत असते. या सभेकरीता महानगरपालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयांसाठी क्षेत्रीय कार्यालय निहाय मुख्य समन्वय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत.

महापालिकेच्या क्षेत्रिय कार्यालयांमध्ये आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी सहभाग घेऊन एकूण ३५ तक्रारवजा सूचना मांडल्या. यात अ,ब,क,ड,इ,फ,ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये अनुक्रमे १०, ४, ५, १, ४, ३, २ आणि ६ तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या. अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे अध्यक्षपद मुख्य समन्वय अधिकारी असलेले अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, सहशहर अभियंता श्रीकांत सवणे, मनोज सेठीया, संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, अजय चारठाणकर यांनी भूषवले. तसेच यावेळी क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित, आण्णा बोदडे, किरण मोरे, राजेश आगळे, सिताराम बहुरे, शितल वाकडे, उमेश ढाकणे उपस्थित होते.

आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी विविध तक्रारी व सूचना मांडल्या. यामध्ये मुख्यत्वे नुकत्याच झालेल्या पावसाचे पाणी रस्त्यावर साचले होते, भविष्यात अशी समस्या पुन्हा उद्भवू नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी आणि अनंत चतुर्दशीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या श्रीगणेश विसर्जनासाठी विसर्जन मार्गावरील रस्त्यावरील अडथळे तसेच अतिक्रमणे दूर करावीत अशा सूचनांचा प्रामुख्याने समावेश होता. तसेच रस्ते आणि ड्रेनेज लाईन्स दुरूस्त कराव्यात, पाणीपुरवठा योग्य दाबाने करावा, शहरात वाढणाऱ्या रहदारीचे योग्य नियोजन करावे या सूचनाही नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

# कुणबी प्रमाणपत्रासाठी राज्यस्तरीय समिती!

## » समिती तत्काळ नेमण्याचा निर्णय परिषदेत घेण्यात आला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षण आणि मराठा समाजातील नागरिकांना कुणबी प्रमाणपत्रे सहजासहजी मिळावीत, यासाठी कायदेशीर बाजू सरकारकडे मांडण्याचा निर्णय सकल मराठा समाजाच्या बैठकीत घेण्यात आला.**



मराठा समाजातील ज्येष्ठ कायदे तज्ज्ञ, संख्या शास्त्रज्ञ, समाज शास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ तसेच इतिहास आणि समाजशास्त्रीय अभ्यासकांची एक राज्यस्तरीय तज्ज्ञ समिती तत्काळ नेमण्याचा निर्णयही सकल मराठा समाज आयोजित आरक्षण परिषदेत घेण्यात आला. जालना जिल्ह्यात मनोज जरंगे यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सकल मराठा समाजाच्या वतीने पुण्यात आरक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला माजी कुलगुरू सर्जेराव निमसे, अॅड. विजयकुमार सपकाळ, अॅड. आशिष गायकवाड, अॅड्. राजेश टेकाळे, एमपीएससीचे माजी चेअरमन मधुकरराव कोकाटे, माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट, डी. डीय देशमुख, अॅड. रमेश दुबे पाटील, अॅड. मिलिंद पवार, राजेंद्र कोंढरे, संजीव भोर, प्राचार्य प्रल्हाद बोराडे, माधव देवसरकर. अॅड सुहास सांवत, बाळासाहेब आमराळे, राजेंद्र कुंजीर आदी उपस्थित होते. कायदे तज्ज्ञ, अभ्यासक, विविध विषयांतील अभ्यासकांची तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात आली असून आठवडाभरात या समितीतील सर्व तज्ज्ञांची नावे माजी कुलगुरू सर्जेराव निमसे लवकरच जाहीर करणार आहेत. ही समिती कायदेशीर संस्थेकडून मराठा आरक्षणाबाबतचा अभिप्राय घेणार आहे. त्यानंतर पुढील दिशा ठरविली जाणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण रद्द केल्यानंतर राज्य सरकारने नियुक्त केलेल्या न्यायमूर्ती भोसले समितीच्या सूचना आणि सर्वोच्च न्यायालयाने नोंदविलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्यात येणार आहे. मराठा आरक्षण आणि मराठा कुणबी प्रमाणपत्रांबाबत भूमिका घेतली जावी, समाजाची मागणी कायदेशीरदृष्ट्या परिपूर्ण असावी असा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. मराठा समाजाचा सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाचा दर्जा पुन्हा प्राप्त करण्यासाठी, तसेच मराठा समाजाच्या सार्वजनिक सेवेतील प्रतिनिधित्वाच्या टक्केवारीबाबत सर्वोच्च न्यायालयाने गृहीत धरलेले सूत्र इंद्रा सहानी निकालास कसे छेद देणारे आहे, अशा बाबी प्रभावीपणे मांडण्यासाठी सरकारवर दबाव टाकण्याचेही या परिषदेत ठरविण्यात आले.

### कायदेशीर मार्गाचा अवलंब

» ही समिती कायदेशीर संस्थेकडून मराठा आरक्षणाबाबतचा अभिप्राय घेणार आहे. त्यानंतर पुढील दिशा ठरविली जाणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण रद्द केल्यानंतर राज्य सरकारने नियुक्त केलेल्या न्यायमूर्ती भोसले समितीच्या सूचना आणि सर्वोच्च न्यायालयाने नोंदविलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्यात येणार आहे. मराठा आरक्षण आणि मराठा कुणबी प्रमाणपत्रांबाबत भूमिका घेतली जावी, समाजाची मागणी कायदेशीरदृष्ट्या परिपूर्ण असावी असा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला.

# चिन्ह काढून घेण्याचं पाप शिंदे गटाने केले!

## » सुप्रिया सुळे यांचे शिंदे गट व भाजपावर टीकास्त्र

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उद्धव ठाकरे यांचा पक्ष व त्यांचं चिन्ह काढून घेण्याचं पाप शिंदे गटाने केले आहे. हे दुर्दैव असून ते महाराष्ट्राच्या राजकारणाला न शोभणारा आहे.असल्याचे सांगत मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर तसेच एकीकडे बेटी पढाव आणि बेटी बचाव म्हणणारी बिजेपीचे लोक पंकजा मुंडे यांच्यावर अन्याय करीत असून भारतीय जनता पार्टी त्यांना लेक मानत नाहीत का ? असा प्रश्न उपस्थित करीत खासदार सुप्रिया सुळे यांनी भाजपा वर जोरदार टीका केली.**



### महारुद्र पाटील राष्ट्रवादीच्या वाटेवर

» मागील वर्षी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देत एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेत प्रवेश करून इंदापूर तालुका प्रमुख पदाची जबाबदारी स्वीकारलेले विद्यमान तालुकाप्रमुख महारुद्र पाटील हे खासदार सुप्रिया सुळे यांच्या आजच्या दिवसभराच्या दौऱ्यात उघडपणे उपस्थित होते.यामुळे पाटील हे लवकरच राष्ट्रवादीशी घरवापसी करणार असे चित्र होते.

सुळे सोमवार (ता.25) रोजी इंदापूर दौऱ्यावर आल्या असता पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम व आरोग्य सभापती प्रवीण माने यांच्या निवासस्थानी युवा कार्यकर्ता संवाद बैठकीच्या प्रसंगी पत्रकारांशी बोलत होत्या. यावेळी सोनाई उद्योग समूहाचे अध्यक्ष दशरथ माने, माजी सभापती प्रवीण माने, माजी जिल्हा परिषद सदस्य अमोल भिसे, किसन जावळे सागर मिसाळ,विठ्ठल ननवरे,छाया पडसळकर, भारत मोरे,किशोर माने यांच्यासह युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. आमदार अपात्रताप्रकरणी आज सोमवार रोजी विधान भवनात सुनावनी पार पडली. यावर बोलताना खा.सुळे म्हणाल्या,स्पीकरच्या ऑफिसवर सुप्रीम कोर्टाने ताशेरे ओढले. सुप्रीम कोर्टाने सांगितल्यावर तरी काहीतरी निर्णय होईल अशी आमची अपेक्षा होती. जी शिवसेना बाळासाहेब ठाकरे यांनी सुरू केली होती ते जिवंत असताना त्याची जबाबदारी उद्धव ठाकरे यांवर दिली. ही पार्श्वभूमी असताना त्यांच्याकडून त्यांचा पक्ष त्यांचं चिन्ह काढून घेण्याचं पाप शिंदे गटाने केले आहे. हे दुर्दैव असून ते महाराष्ट्राच्या राजकारणाला न शोभणारा आहे. अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेवर केली. तर पंकजा मुंडे यांच्या कारखान्यावर झालेल्या कारवाई संदर्भात बोलताना खा.सुळे म्हणाल्या, गोपीनाथ मुंडे हयात नाहीत म्हणून त्यांच्या लेकीशी तुम्ही कसेही वागाल ? हा अन्याय आहे. कोणतही राजकारण न करता या राज्यातील आणि देशातील कुठल्याही लेकीवर अन्याय होत असेल तर मी तिच्या बाजूने खंबीरपणे उभी राहिल. पंकजा मुंडे यांचे वडिल गोपीनाथ मुंडे यांनी हयात असताना जेवढं भारतीय जनता पक्षाचे केले तेवढे करणारे महाराष्ट्रात नेते कमी असतील.सत्तेत नसताना पक्ष सत्तेत असण्यासाठी केवढे कष्ट केले. आज त्यांची मुलगी लढतेय.मात्र भारतीय जनता पक्ष म्हणा किंवा अदृश्य हाताने त्यांच्या घराचा लिलाव कसा थांबवला असा सवाल उपस्थित करीत एकीकडे बेटी पढाव आणि बेटी बचाव म्हणणारी ही लोक मग पंकजा मुंडे भारतीय जनता पार्टीची लेक नाही का ? असा प्रति सवाल ही खा. सुप्रिया सुळे यांनी भाजपला केला आहे.

# गणेश उत्सवासाठी 200 स्वच्छतागृह!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।



गणेशोत्सवावेळी भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी लोकसहभागातून २०० स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच गरोदर महिलांना आरामासाठी तीन व्हॅनिटी व्हॅन स्वरूपात हिरकणी कक्ष, पोलीस आणि महापालिका कर्मचाऱ्यांसाठी विनामूल्य भोजन व्यवस्था करण्यात येणार आहे. गणेशोत्सवाचे शेवटचे तीन दिवस आणि अनंत चतुर्दशीला ही व्यवस्था पुणे शहरातील गर्दीच्या ठिकाणी करण्यात येईल. देशभरातील भाविकांचे पुण्याचा गणेशोत्सव प्रमुख आकर्षण आहे. शहरातील गणेश मंडळांची सजावट, देखावे पाहण्यासाठी अन्य शहरांतून मोठ्या प्रमाणावर नागरिक येत असतात. या कालावधीत शहरातील अपुऱ्या स्वच्छतागृहांमुळे नागरिकांची विशेषत: महिलांची मोठी अडचण होते.

त्यामुळे पालकमंत्री, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ही सुविधा देण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

लोकसहभागातून २०० स्वच्छतागृहे, व्हॅनिटी व्हॅनच्या स्वरुपात तीन हिरकणी कक्ष आणि पोलीस तथा मनपा कर्मचाऱ्यांसाठी मोफत जेवणाची व्यवस्था केली आहे. यावेळी गणेशभक्तांची गैरसोय होणार नसून उत्सवाचा आनंद सहज लुटता येईल, असे पाटील यांनी सांगितले.

# बाप्पांच्या निमित्ताने राजकीय 'गप्पा'!

## राष्ट्रवादीत जोर-बैठका : दोन्ही गटांकडून शक्तीप्रदर्शनाचा प्रयत्न





। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नियमांमध्ये शिथिलता आल्याने यंदाचा गणेशोत्सव मोठ्या धुमधडाक्यात साजरा होताना दिसत आहे. गणेश मंडळांकडूनही सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय कार्यक्रमांचा सोहळा आयोजित केला जात आहे. या सोहळ्यानिमित्त गणेश मंडळांना भेटी देऊन आपला जनसंपर्क कायम राखण्याचा प्रयत्न राज्यातील नेत्यांकडून होत आहे.**

गेल्या दोन दिवसांत दोन्ही राष्ट्रवादीचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार रोहित पवार यांनी शहरात दौरे आयोजित करून गणेश मंडळे पिंजून काढली आहेत. राष्ट्रवादीसह इतरही पक्षातील नेत्यांनी सार्वजनिक आणि खासगी दौरे करून पदाधिकारी, कार्यकर्त्यांना ताकद देण्याचे काम केले आहे. नेत्यांच्या दौऱ्यामुळे शहरात गणेशोत्सवानिमित्त राजकीय मांदियाळी पहायला मिळत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकसभा निवडणूकीनंतर पिंपरी-चिंचवडकडे पाठ फिरविल्याचे चित्र होते. मात्र राजकीय घडामोडी वेगाने बदलत असताना त्यांनी पुन्हा आपल्या एकेकाळच्या बालेकिल्ल्यात लक्ष घालायला सुरूवात केली आहे. नुकतीच त्यांनी आयुक्तांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेत विकासकामांचा आढावा घेतला.

तसेच रविवारी (दि. 24) त्यांनी पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभेतील सर्व

**ग्राउंड रिपोर्ट**

गणेश मंडळांना भेटी देऊन श्री गणरायाची आरती केली. अजित पवारांनी आपला दौरा सकाळी 9 वाजल्यापासूनच सुरू केला होता. त्यांचे शहरात समर्थकांनी मोठ्या जल्लोषात स्वागत देखील केले.

दुसरीकडे खा. शरद पवार गटाच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी देखील शहरात लक्ष घालायला सुरूवात केली आहे. शनिवारी (दि. 23) त्यांनी शहरातील तब्बल 35 गणेश मंडळांना भेटी देऊन तरूणांशी संवाद साधला. रोहित पवार पहाटे तीन वाजेपर्यंत शहरातील गणेश मंडळांना भेटी देत होते.

त्यामुळे त्यांच्या दौऱ्याची चर्चा रंगली आहे. याबरोबरच त्यांनी ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत आपले राजकीय बस्तान शहरात बसवायला सुरूवात केल्याचे पहावयाला मिळाले.

### विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंचा खासगी दौरा

विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शनिवारी (दि. 23) शहरात खासगी दौरा केला. शिवसेना (ठाकरे गट) शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले यांच्या जनसंपर्क कार्यालयाला त्यांनी भेटी दिल्या. तसेच मावळ जिल्हाप्रमुख माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार यांच्या कार्यालयाला देखील त्यांची नियोजित भेट होती. या वेळी सार्वजनिक कार्यक्रम अथवा गणेश मंडळांच्या भेटी त्यांनी घेतल्या नसल्याची चर्चा आहे.

श्री गणरायाच्या आरती आणि दर्शनासाठी राज्यातील नेते आपला मोर्चा शहराकडे वळवित असल्याचे पहायला मिळत आहे. राज्यावरचे संकट टळू दे, असे साकडे गणरायांना घातल्याच्या प्रतिक्रिया हे नेते देत आहेत. मात्र राजकीय दृष्ट्या गणरायाच्या आशिर्वाद कौल कोणाच्या बाजूने झुकणार हे आगामी निवडणूकीनंतरच स्पष्ट होणार आहे.

---

# लोकनेते लक्ष्मणभाऊ यांच्या आठवणींना उजाळा!

## शिवराय मित्र मंडळाचा देखावा : मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन




। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपळे गुरव येथील शिवराय मित्र मंडळाच्या वतीने लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या आठवणींचा देखावा सादर करताना दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांना अनोखी श्रद्धांजली देण्यात आली. मंडळाचे हे ३६ वे वर्ष असून मंडळांच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.**

शिवराय मित्र मंडळाच्या वतीने लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या विविध फोटोंचे कोलाजचा देखावा करण्यात आला आहे. यामध्ये त्यांच्या संघर्ष कालापासूनचे विविध फोटो यामध्ये उपलब्ध आहेत. या फोटोच्या माध्यमातून लक्ष्मण जगताप यांचा नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष, महापौर, आमदार, भाजप शहराध्यक्ष असा छायांकित प्रवास उलघडून दाखविण्यात आला आहे.

पिंपळे गुरव येथील अनेक मित्रमंडळांचे लोकनेते लक्ष्मण जगताप यांच्याशी ऋणानुबंध होते. आध्यात्मिक वारसा जपणारे आमदार लक्ष्मण जगताप यांनी अनेक मंडळांना स्थिरस्थावर करण्यासाठी सढळहस्ते मदत देखील केली. यामुळे अनेक मंडळे हक्काने लक्ष्मणभाऊ यांच्याकडे येत असत. आलेल्या मंडळांना व त्यांच्या प्रतिनिधींची भाऊ आपुलकीने चौकशी करत असत. आज लक्ष्मणभाऊ नसले तरी आजही अनेक मंडळे ठामपणे उभी आहेत, कारण त्यांचा वारसा शहराध्यक्ष शंकरभाऊ चालवत आहेत, असे मंडळाचा देखावा सादर करणारे शिवाजी रावडे यांनी बोलताना सांगितले.

> लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप आणि पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांचे नाते अनोखे आहे. शहराच्या विकासात योगदान देणाऱ्या लक्ष्मणभाऊंचा जिव्हाळा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांशीही कायम राहीला. गणेशोत्सवाची तयारी सुरू झाली की लक्ष्मणभाऊंकडे कार्यकर्त्यांची वर्दळ पहायला मिळत होती. उत्सव शांततेत आणि सलोख्याच्या वातावरणात व्हावा, यासाठी भाऊ कायम आग्रही होते. सामाजिक, अध्यात्मिक आणि धार्मिक क्षेत्रात लक्ष्मणभाऊंचा वारसा जोपासण्याचा प्रयत्न भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वजण करीत आहेत.
>
> **- कैलास उर्फ पोपट अण्णा जगताप,** सामाजिक कार्यकर्ते.

अभिजित देवकर, संदीप जांभूळकर, विशाल कदम, रवी जगताप, ज्ञानेश्वर बिरादार, श्रीकांत पाचारणे, आशिष कवडे, संदेश कदम, रुपेश नवले, शंतनू धनवटे, अक्षय कदम, महेश देवकर, शुभम कदम, चिराग जगताप, आकाश जगताप, सुरज जगताप, किरण जगताप, स्वराज कदम, पृथ्वी जगताप, ज्ञानेश कदम, वैभव सुतार, आतिश जांभूळकर, अक्षय जाधव, प्रणव जगताप, प्रतिक कवडे, , प्रसाद गुंजाळ, मोहित बनकर, अण्णा लोहार, रुपेश नवले, स्वप्नील घुले, अथर्व देवकर, अमर कदम, शुभम गायकवाड, अमित शिंदे, शंकर चव्हाण आदी कार्यकर्ते यांनी उपक्रमासाठी पुढाकार घेतला.




# ते चार 'ऐतिहासिक' दिवस...

**गाजावाजा करत सुरू झालेले संसदेचे विशेष अधिवेशन संपले. महिलांच्या आरक्षणाचे विधेयक संमत झाले. नेहरूकालीन इतिहास बाजूला ठेवून खासदारांनी संसदेच्या नव्या इमारतीत प्रवेश केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या उज्ज्वल भविष्याची ग्वाही दिली.**

मग, भाजपचे खासदार रमेश बिधुरी यांनी मोदींना खोटे ठरवले. निशिकांत दुबे यांच्यासारखे लढवय्ये भाजप नेते बिधुरींच्या वाह्यातपणाचे खापर विरोधकांवरच फोडत आहेत. हिंदूत्वाच्या विचारांसाठी लढणाऱ्या भाजपच्या नेत्यांची पाठराखण केली जाते, बिधुरींचीही केली जात असेल तर नवे काही नाही. या वादापलीकडेही अनेक गोष्टी चार दिवसांच्या अधिवेशनात घडल्या. संसदेचे विशेष अधिवेशन विरोधकांना अंधारात ठेवून केलेला सुनियोजित इव्हेन्ट होता. मोदींच्या नेतृत्वाची खुंटी हलवून बळकट करणारा उत्सव होता. मोदींनी संसदेत चार दिवसांमध्ये सहा वेळा भाषण केले. त्यातही एकाच दिवशी सलग तीन भाषणे केली. या सहाही भाषणातील मुद्दे कमी-अधिक फरकाने सारखेच होते. दोन भाषणे अतिदीर्घ होती, ती ऐकताना भाजपचे वरिष्ठ मंत्री सभागृहात जांभया देत होते. मध्यवर्ती सभागृहात मोदींचे भाषण ऐकतानाच भाजपचे काही खासदार गप्पांत मश्गूल होते. काही खासदार मोबाइलवर चॅटिंग करत



होते. या कार्यक्रमातून संसदेच्या जुन्या वास्तूला निरोप दिला गेला, तिथून मोदींच्या नेतृत्वाखाली मंत्री-नेते नव्या इमारतीत गेले. मग मोदींनी नव्या लोकसभेत भाषण केले, तिथून ते राज्यसभेत गेले; तिथे त्यांनी भाषण केले. महिला आरक्षण विधेयक मंजूर झाले म्हणून लोकसभेत छोटेखानी भाषण केले. मग मोदींनी राज्यसभेत रात्री उशिरा आभाराचे भाषण केले. त्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता! मध्यवर्ती सभागृहातील निरोपाचा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी मोदी सत्ताधारी-विरोधी खासदारांच्या भेटीगाठी घेत होते. एका कोपऱ्यात मोदींचे राज्यसभेतील एक कट्टर विरोधक खासदार उभे असलेले दिसले. या पत्रकार खासदारांची राज्यसभेतील मुदत आता संपत आलेली आहे. मोदी या खासदारांसमोर थांबले, त्यांनी खासदारांच्या पाठीवर थाप मारली आणि मिनिटभर ते या खासदारांशी बोलत होते. मोदींच्या विरोधी खासदाराशी झालेल्या हास्यविनोदाची चर्चा रंगली होती! नव्या संसद इमारतीमध्ये इतकी गर्दी झाली होती की, जणू जत्रा भरली असावी. महिला आणि शाळकरी मुला-मुलींचे लोंढे आत जा-ये करत होते. त्यांना महिला आरक्षणाचे महत्त्व पटवून दिले जात असावे. दोन्ही सभागृहांच्या बाहेर लांबलचक रांगा लागल्या होत्या. नव्या संसद इमारतीत कुठे काय आहे याची तिथल्या कर्मचाऱ्यांनादेखील माहिती नाही तर बाहेरून आलेल्या भाजपच्या तमाम महिला कार्यकर्त्यांना कुठून कळणार? अनेकदा ही मंडळी वेगळ्याच कक्षात घुसत होती. कोणी पिण्याच्या पाण्यासाठी धावत होते, कोणी कँटीन शोधत होते. भाजपने दिल्ली, राजस्थान, गुजरात इथूनही शेकडोच्या संख्येने लोक नव्या संसद इमारतीच्या दर्शनासाठी आणले होते. संसद भवनातही दरवर्षी देशभरातून मोठ्या संख्येने लोक अधिवेशनाचे कामकाज पाहायला येत असत. संसदेच्या आवारात नेहमीच गर्दी असे, त्यामुळे नवी संसद इमारत पाहायला लोक आले तर नवल काहीच नाही. यापूर्वी संसदेला असे जत्रेचे स्वरूप कधीच आलेले पाहिले गेलेले नाही. राज्यसभेत प्रेक्षक कक्षामध्ये अत्यंत शांतता पाळावी लागते. पण हा नियम धुळीला मिळाला होता, प्रेक्षक कक्षाचा औचित्यभंग करून 'मोदी-मोदी' अशा घोषणा दिल्या गेल्या. त्याविरोधात 'तृणमूल काँग्रेस'च्या खासदाराने आता राज्यसभेच्या सभापतींना पत्र लिहिले आहे. भाजपमध्ये अनेक 'स्टार कलाकार' आहेत, जसे बिधुरी आहेत तसेच केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री अनुराग ठाकूर आहेत. ठाकूर यांनी बॉलीवूडमधील आपले नेटवर्क वापरून संसदेमध्ये बॉलीवूडमधील काही आघाडीच्या अभिनेत्रींना आमंत्रित करून अशी काही वातावरण निर्मिती केली होती की, त्या अभिनेत्रींचा तिथला वावर पाहून त्यांनीच महिला आरक्षण विधेयक संमत केले असल्याचा भास व्हावा! नव्या संसद इमारतीच्या मध्यवर्ती भागामध्ये 'संविधान कक्ष' उभारण्यात आला आहे. तिथे संविधानाची प्रत ठेवली गेली आहे. त्याच्या आजूबाजूला भारताच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारे अनेक पैलू पाहायला मिळतात. ठाकूर सभागृहापेक्षा संविधान कक्षामध्ये अधिक व्यग्र होते. सलग चार दिवस मुंबईहून एकामागून एक अभिनेत्री येत होत्या. त्यांच्याभोवती पत्रकारांचा, बाहेरून आलेल्या महिलांचा, मंत्र्यांचा-नेत्यांचा गराडा पडला होता.

## संपादकीय »

# गुणवत्तेच्या बैलाला..

***खासगी संस्थांच्या हितसंबंधांची अधिक काळजी असल्याने सामाजिक आरोग्याकडे सरकारने दुर्लक्ष करण्याचे ठरवलेले दिसते.***

सरकारच्या तिजोरीत कायमच खडखडाट असल्याने चाळीस वर्षांपूर्वी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्रात खासगी क्षेत्रास मुक्तद्वार दिले गेले. त्यानंतर देशभर त्याचे लोण पसरले. प्रत्येक लोकप्रतिनिधीला आपल्या मतदारसंघात शिक्षणसंस्था उभी करून या दोन्ही विद्याशाखांची महाविद्यालये स्थापन करण्यात रस वाटू लागला. उच्चभ्रू वाटावा, असा हा व्यवसाय करताना सरकारी आशीर्वादानेच अधिक शिक्षणशुल्क घेण्याची परवानगी मिळाल्याने अनेक शिक्षणसम्राट तयार झाले आणि ते; तसेच या संस्था गब्बर होत गेल्या. त्यामुळे वैद्यकीय असो वा अभियांत्रिकी पदवी परीक्षेनंतरचा पदव्युत्तर अभ्यासक्रम हीदेखील कालानुरूप आवश्यक गरज ठरू लागली. परंतु या पदव्युत्तरच्या संधी इतक्या प्रमाणात उपलब्ध करून दिल्या गेल्या की विद्यार्थी कमी आणि जागा जास्त अशी परिस्थिती निर्माण झाली.

**पालघर जिल्ह्याच्या मोखाडा तालुक्यात कुपोषणामुळे बालमृत्यू होत असल्याच्या बातम्या २००५ आणि २००६ या वर्षांत येत होत्या. त्याची दखल घेऊन मुंबईतील निर्मला निकेतन समाजकार्य महाविद्यालयातील प्रा. अंजली कानिटकर आणि डॉ. हेलन जोसेफ यांच्या पुढाकाराने दुर्गम भागात होणाऱ्या बालमृत्यूंमागील कारणे शोधून त्यावर उपाययोजना सुचवण्यासाठी एक प्रकल्प हाती घेण्यात आला.**

# आदिवासी उत्थानाचे 'आरोहन'

'ॲक्शन रिलेटेड टू द ऑर्गनायझेशन ऑफ एज्युकेशन, हेल्थ अँड न्यूट्रिशन' (एआरओईएचएन – आरोहन) या नावाने कामाची सुरुवात झाली. रोजगारासाठी होणारे स्थलांतर, कुपोषण तसेच आरोग्य व्यवस्थेतील त्रुटींमुळे बालमृत्यू होत असल्याचे अभ्यासकांना आढळले. या समस्या सोडवायच्या तर तातडीने काही ठोस करण्याची गरज त्यांना वाटली. त्यांनी उपाययोजना करण्यास सुरुवात केली. २०१४ मध्ये 'आरोहन'ची नोंदणी सामाजिक संस्था म्हणून करण्यात आली. डॉ. हेलन जोसेफ, अंजली कानिटकर आणि त्यांचे नऊ सहकारी संस्थेचे काम पुढे नेत आहेत. कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यू आणि रोजगारासाठी होणारे स्थलांतर या पालघर जिल्ह्यातील प्रमुख समस्या लक्षात घेऊन ग्रामीण भागातील लोकवस्त्यांना स्वयंपूर्ण करण्याचे आव्हान 'आरोहन' संस्थेने स्वीकारले आहे. आरोग्य शिक्षण, पोषक आहार, जलसंधारण आणि स्थानिक पातळीवरच रोजगारनिर्मिती या संदर्भातील संस्थेचे कार्य दखल



घेण्याजोगे आहे. सध्या जिल्ह्यातील ४७ ग्रामपंचायती, ९८ महसुली गावे, ३३१ पाडे आणि ३३० अंगणवाडी केंद्रांमध्ये संस्था १०० पेक्षा अधिक कर्मचारी, स्वयंसेवकांच्या मदतीने कार्यरत आहे. सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठा या मूल्यांच्या पायावर शाश्वत बदल घडवून आणण्याची क्षमता आदिवासींमध्ये निर्माण करणे हे 'आरोहन'चे ध्येय आहे. ते साध्य करण्यासाठी ग्रामीण-आदिवासी युवावर्गाची फळी निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण काम संस्था करत आहे. गेल्या दीड दशकात संस्थेने मोखाडा, जव्हार, डहाणू आणि पालघर तालुक्यांमध्ये आपल्या कामाचा विस्तार केला आहे. सध्या संस्थेमार्फत राबवण्यात येणारे प्रकल्प २० हजार नागरिकांच्या जीवनाशी निगडित आहेत.

डोंगराळ प्रदेश असलेल्या या भागात २५०० मिलिमीटरपेक्षा अधिक पर्जन्यमान होते. वाहून जाणाऱ्या पाण्याच्या साठवणुकीसाठी विशिष्ट रचनेच्या लघु आणि मध्यम बंधाऱ्यांची कामे संस्थेने हाती घेतली आहेत. त्याचबरोबर सौर ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून उपसा सिंचन पद्धत राबवणे, ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करणे, वाफे तयार करून तसेच मल्चिंग (आच्छादन) या आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण आणि प्रोत्साहन देण्याचे काम संस्था करत आहे. कुपोषणामुळे होणारे माता आणि बालमृत्यू ही जव्हार-मोखाड्यातील गंभीर समस्या. त्यामुळे या प्रश्नावर संस्थेने काम करणे क्रमप्राप्तच होते. शून्य ते सहा वर्षे वयोगटातील आदिवासी मुलांच्या वाढीचे नियमित मापन, मुलांचे आणि गरोदर महिलांचे वेळेवर लसीकरण व्हावे यासाठी संस्थेने स्थानिक अंगणवाड्यांसह काम केले. बालसंगोपनातील महत्त्वाच्या गोष्टींची माहिती महिलांना देण्यासाठी संस्थेने माता मेळावे आयोजित केले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आमदार अपात्रची सुनावणी संपली!

## » दोन्ही गटाकडून युक्तिवाद ;पुढील सुनावणी 13 ऑक्टोबरला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आमदार अपात्रतेप्रकरणी 14 सप्टेंबरला झालेल्या पहिल्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आज (25 सप्टेंबर) विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात पार पडली. या सुनावणीमध्ये वेळापत्रक निश्चित होणार असले, तरी ही प्रक्रिया यावर्षी पूर्ण होण्याची शक्यता धुसर आहे.**

आमदार अपात्रता प्रकरणी यावर्षी निकाल लागणे कठीण असल्याचे बोलले जात आहे. आजच्या सुनावणीनंतर आता पुढील सुनावणी 13 ऑक्टोबर रोजी होणार आहे. दरम्यान, या संभाव्य वेळापत्रक पत्रकात कागदपत्र तपासणी, त्याचबरोबर साक्ष नोंदवणे, उलट तपासणी मुद्द्यांचा समावेश असल्याने या प्रक्रियेत तीन महिन्यांचा कालावधी जाण्याची शक्यता आहे. डिसेंबरमध्ये विधानसभेचे हिवाळी अधिवेशन असल्याने त्या दरम्यानच्या कालावधीत सुनावणी होण्याची शक्यता धुसर असल्याने आता जानेवारी 2024 मध्ये निर्णय येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. उद्धव बाळासाहेब



ठाकरे यांच्या शिवसेनेने आमदार अपात्रतेवरील सुनावणीस उशीर होत असल्याचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयासमोर एका याचिकेद्वारे उपस्थित करून विधानसभा अध्यक्षांना तातडीने सुनावणी घ्यायला सांगावे, अशी विनंती केली होती. या याचिकेवरील सुनावणीदरम्यान सुप्रीम कोर्टाने आमदार अपात्रतेच्या कारवाईच्या दिरंगाईबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशावरून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी 14 सप्टेंबरला पहिली सुनावणी घेतली होती. शिवसेना आमदारांच्या अपात्रतेच्या प्रकरणावर आज विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर

### शिंदे गटाचा वकीलांनी घेतला आक्षेप ?

» सर्व याचिका एकत्र करा. आमची मागणीवर विचार का केला जात नाही?", असं ठाकरे गटाचे वकील देवदत्त कामत म्हणाले. त्यावर शिंदे गटाच्या वकिलांनी आक्षेप घेतला. सगळ्या याचिकांची सुनावणी एकत्रित नको, असा आक्षेप शिंदे गटाचे वकील अनील साखरे यांनी नोंदवला आहे. पण सर्व 34 याचिकांवर एकत्रित सुनावणी घेतली तर या प्रकरणावर लवकर निकाल घेता येईल. सर्व याचिकांचा मुद्दा हा अपात्रतेचाच आहे. त्यामुळे सर्व 34 याचिकांवर एकत्रित सुनावणी घ्या, असा युक्तिवाद ठाकरे गटाच्या वकिलांनी केलाय. पण याच युक्तिवावर शिंदे गटाच्या वकिलांनी आक्षेप घेतलाय.

आज दुसऱ्यांदा प्रत्यक्ष सुनावणी पार पडली. या सुनावणीवेळी दोन्ही गटाकडून जोरदार युक्तिवाद करण्यात आला. ठाकरे गटाचे वकील देवदत्त कामत यांनी युक्तिवादाला सुरुवात केपुढील सुनावणी कशी घेणार आहात? वेळापत्रक कसं असेल? किती वेळ लागेल? असे प्रश्न ठाकरे गटाच्या वकिलांनी विधानसभा अध्यक्षांना विचारले. यावेळी ठाकरे गटाच्या वकिलांनी मांडलेल्या युक्तिवादावर शिंदे गटाच्या वकिलांकडून आक्षेप घेण्यात आले.

# सर्वांना आणि सगळे काही विकत घेऊ शकतो

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

आपण सर्वांना आणि सगळं काही विकत घेऊ शकतो, या भंपक भ्रमामुळे चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सुपीक डोक्यातून ही कल्पना बाहेर आली आहे. त्यांनी एवढंच सांगावं, हा आविष्कार त्यांचा आहे की त्यांच्या पक्षातील बॉस ने असे फर्मान जारी केले आहे? अशा शब्दात विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्या वक्तव्यावर टीका केली आहे. पत्रकारांना चहा पाण्याला बोलवत जा, अशा शब्दात बावनकुळे यांनी कार्यकर्यांना मार्गदर्शन केले होते. त्यांच्या वक्तव्यानंतर राज्यभरातून त्यांच्यावर टीका होत आहे. यावर विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी देखील सडकून टीका केली आहे. या संदर्भात अंबादास दानवे यांनी माध्यमांशी बोलताना बावनकुळे यांच्यावर टीका केली. ते म्हणाले की, 'आपण सर्वांना आणि सगळं काही विकत घेऊ शकतो, या भंपक भ्रमामुळे चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सुपीक डोक्यातून ही कल्पना बाहेर आली आहे. त्यांनी एवढंच सांगावं, हा आविष्कार त्यांचा आहे की त्यांच्या पक्षातील बॉस ने असे फर्मान जारी केले आहे? माध्यमे तुमच्याच इशाऱ्यावर चालतील, असे दिवस अजून तरी आलेले दिसत नाहीत. कारण असे असते तर त्यांनी तुम्हाला माणिपूरचा आरसा दाखवला नसता चंद्रशेखर बावनकुळे जी. असले धंदे जनमतही बदलत नाही. कर्नाटक निवडणूक त्याचे जवळचे उदाहरण आहे.' असे सांगायलाही बावनकुळे विसरले नाहीत. भारतीय जनता पक्षाच्या बुथ लेव्हलच्या पदाधिकाऱ्यांनी आप-आपल्या भागातील पत्रकारांशी चांगले संबंध ठेवावेत, असे सांगताना अप्रत्यक्षपणे पत्रकारांना मॅनेज करण्याचा सल्लाच बावनकुळे यांनी दिला आहे. 2024 ची लोकसभा निवडणूक होऊपर्यंत एकही बातमी आपल्या विरोधात येणार नाही याची काळजी घेतली पाहिजे, असेही बावनकुळे म्हणाले. भारतीय जनता पक्षाच्या वतीने 'महाविजय 2024 लोकसभा प्रवास' या 'घर चलो अभियान'साठी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे सध्या राज्यभर फिरत आहेत. याच कार्यक्रमासाठी ते खासदार सुजय विखे पाटील यांच्या मतदार संघात होते.

# पुढाऱ्यांमध्ये बोलायची हिंमतच कशी?

## » बावनकुळेंच्या वक्तव्यावरुन मनसेआक्रमक

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पत्रकारांच्या लेखणीने अनेक सत्ताधाऱ्यांना घाम फुटायचा पण 'विरोधात बातम्या न येण्यासाठी ढाब्यावर न्या' असं पुढाऱ्यांमध्ये बोलायची हिंमतच कशी होते ? असा सवाल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने उपस्थित करण्यात आला आहे. भाजप प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना पत्रकारांना महिन्यातून एकदा चहाला बोलावण्याचा सल्ला दिला होता. इतकेच नाही तर आपल्या विरोधात ते बातमी लावणार नाही, याची काळजी घेण्याचेही त्यांनी सांगितले होते. यावरुन आता बावनकुळे यांच्यावर सर्वच स्तरातून टीका होत आहे.**



### कार्यकर्त्यांना धक्कादायक सल्ला

» भारतीय जनता पक्षाच्या वतीने 'महाविजय 2024 लोकसभा प्रवास' या 'घर चलो अभियान'साठी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे सध्या राज्यभर फिरत आहेत. प्रसार माध्यमांमध्ये आपल्या विरोधात बातम्या येऊ नयेत, यासाठी काय काळजी घ्यायची, यासंबंधी बोलताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनमुळे यांनी कार्यकर्त्यांना धक्कादायक सल्ला दिला आहे.

या संदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या अधिकृत माध्यमांतूनही टीका करण्यात आली आहे. इतकेच नाही तर मनसेच्या वतीने पत्रकारांनाही प्रश्न विचारण्यात आले आहेत. यावर काही जण आत्मपरीक्षण करतील का? असा प्रश्न मनसेच्या वतीने विचारण्यात आला आहे. 'पत्रकारांच्या लेखणीने अनेक सत्ताधाऱ्यांना घाम फुटायचा पण 'विरोधात बातम्या न येण्यासाठी ढाब्यावर न्या' असं पुढाऱ्यांमध्ये बोलायची हिंमतच कशी होते ? ह्याचं आत्मपरीक्षण महाराष्ट्रासारख्या लढाऊ भूमीत जन्मलेले आणि सत्ताधाऱ्यांकडे वहावत गेलेले काही जण करतील का? आता आमच्या ह्या प्रश्नावर पत्रकार आमच्याविरोधात सडकून लिहायला सुरुवात करतील. पण २४ तास राजकीय क्षेत्राला झोडणाऱ्या (जे आवश्यक आहेच) पत्रकारांना एका वाक्याची टीकाही कधी सहन होत नाही पण एखादा नेता सरधोपट पत्रकारितेवर लाचखोरीचा आरोप करतो पण आमचे पत्रकार बांधव गप्प बसणार. जे त्यांना 'चाय बिस्कुट'वाले म्हणणार त्यांच्याच पालख्या वाहणार. बाकी ज्यांनी लोकशाहीच धाब्यावर बसवली त्यांचं काय करायचं ते आता लोकशाहीच ठरवेल. पण पत्रकार बांधवांनो लोकशाहीच्या स्तंभांना बटीक बनवू पाहणाऱ्या पुढाऱ्याविरोधात पेटून उठा !' बावनकुळे म्हणाले की, 'पत्रकारांना दर महिन्याला चहाला बोलवा, त्यांना ढाब्यावर जेवायला घेऊन जा, पत्रकारांना दर महिन्याला चहा प्यायला बोलवायचे म्हणजे काय, हे तुम्हाला समजलेच असेल. असे सांगायलाही बावनकुळे विसरले नाहीत.

भारतीय जनता पक्षाच्या बुथ लेव्हलच्या पदाधिकाऱ्यांनी आप-आपल्या भागातील पत्रकारांशी चांगले संबंध ठेवावेत, असे सांगताना अप्रत्यक्षपणे पत्रकारांना मॅनेज करण्याचा सल्लाच बावनकुळे यांनी दिला आहे. 2024 ची लोकसभा निवडणूक होऊपर्यंत एकही बातमी आपल्या विरोधात येणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

# मी हवेत बोलत नाही : पंतप्रधान मोदी

## घमंडिया आघाडी सनातनला नष्ट करू इच्छिते

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जयपूरमध्ये भाजपच्या परिवर्तन संकल्प रॅलीत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले की, काँग्रेसने ज्या पद्धतीने सरकार चालवले आहे, ते शून्य क्रमांकास पात्र आहे, त्यामुळे राजस्थानच्या जनतेने गेहलोत सरकार हटवून भाजपला परत आणण्याचा निर्णय घेतला आहे.**

ते म्हणाले, मोदी म्हणजे गॅरंटी पूर्ण होण्याची गॅरंटी, हे जनतेने लक्षात ठेवावे. भाजपचे सरकार आल्यास पेपर फोडणाऱ्या माफियांवर कडक कारवाई केली जाईल. अहंकारी आघाडीवर ते म्हणाले की, त्यांना सनातनला उखडून टाकायचे आहे, पण ते स्वतःच येत्या निवडणुकीत उखडून जातील. तत्पूर्वी, दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या धानक्यातील जन्मस्थानी पोहोचून त्यांना आदरांजली वाहिली. त्याचवेळी ते सभेच्या ठिकाणी उघड्या जीपमध्ये उभे राहून लोकांमध्ये गेले. येथे महिला कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले. जयपूरमध्ये साडेचार वर्षांनंतर मोदींची सभा झाली आहे. मी जयपूरला अशा वेळी आलो आहे जेव्हा भारताचा अभिमान शिखरावर आहे. भारत चंद्राच्या पृष्ठभागावर पोहोचला आहे, जिथे इतर कोणीही करू शकत नाही. भारताच्या कामगिरीने संपूर्ण जग आश्चर्यचकित झाले आहे. गेली अनेक दशके आमच्या माता-भगिनी लोकसभा आणि विधानसभेत 33 टक्के आरक्षणाची वाट पाहत होत्या, तुमच्या मताच्या



बळावर त्यांची आशा पूर्ण झाली आहे. तुमच्या मताने मला निवडून दिले आणि मी तुमच्या सेवेची गॅरंटी दिली. आज मी तुमची ही गॅरंटी पूर्ण केली आहे. मोदी म्हणजे गॅरंटी पूर्ण होण्याची गॅरंटी, हे तुम्ही लोकांनी लक्षात ठेवावे. मी जे काही बोलतो ते करतो. म्हणूनच माझी गॅरंटी व्हॅलिड आहे. मी हे हवेत बोलत नाही, माझा 9 वर्षांचा ट्रॅक रेकॉर्ड आहे. वन रँक-वन पेन्शनचे आश्वासन मोदींनी दिले होते, ते आश्वासन मोदींनी पूर्ण केले आहे. या पेन्शनमधून आतापर्यंत लोकांना 70 हजार कोटी रुपये मिळाले आहेत. काँग्रेसला फक्त 500 कोटी रुपये देऊन वन रँक-वन पेन्शन द्यायची होती. जेव्हा हेतू स्पष्ट असतो आणि स्वतःवर विश्वास असतो, तेव्हा गॅरंटी पूर्ण करणे ही सरकारची ओळख बनते. भ्रष्टाचाऱ्यांवर कठोर कारवाईची गॅरंटी आम्ही दिली होती, आज देशात प्रत्येक भ्रष्टाचाऱ्यांवर कायद्याचा बडगा उगारताना दिसत आहे. तिहेरी तलाकविरोधात कायदा आणून मुस्लिम महिलांचे अश्रू पुसले. जे काँग्रेसवाले महिला आरक्षणाबाबत बोलत आहेत त्यांना हे काम 30 वर्षांपूर्वी करता आले असते, पण काँग्रेसवाल्यांना हे कधीच नको होते. आजही तुम्ही सर्व भगिनी नारी शक्ती वंदन कायद्याच्या समर्थनार्थ तुमच्या मनापासून नव्हे तर त्याचा परिणाम म्हणून थेट आला आहात. काँग्रेस आणि त्यांचे अहंकारी मित्र पक्ष महिला आरक्षणाचे कट्टर विरोधक आहेत. एवढा मोठा निर्णयही ते वळविण्याचा प्रयत्न करत आहेत, ज्या काँग्रेसच्या सहकाऱ्यांनी हे विधेयक यूपीए सरकारच्या काळात थांबवले होते ते त्यांच्यावर दबाव आणत आहेत, त्यामुळे राजस्थानच्या महिलांना सतर्क राहावे लागेल.

### पेपर लीक : माफियांवर कारवाई

» राजस्थानातील अनेकांनी मोठा वारसा सोडला आहे. काँग्रेस आणि अहंकारी आघाडीने सनातनला मुळापासून पुसून टाकण्याची घोषणा केली आहे. काही मतांसाठी तुष्टीकरणाचे हे धोरण राजस्थानच्या समाजाला चांगलेच कळत आहे. काँग्रेस आमची ओळख पुसण्याच्या तयारीत आहे. येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत अहंकारी युतीला याचा फटका सहन करावा लागेल, ते उखडले जातील. राजस्थानमध्ये जेव्हा पेपर फुटतात तेव्हा लोक चिंतेत पडतात. येथील सरकार पेपर लीक माफियांना संरक्षण देते. राजस्थानमध्ये भाजपचे सरकार आल्यानंतर पेपर लीक करणाऱ्या माफियांवर कडक कारवाई केली जाईल.

# राहुल गांधींचा रेल्वेतून 117 किमी प्रवास!

## स्लीपर कोचमध्ये लोकांच्या समस्या जाणून घेतल्या

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**छत्तीसगड दौऱ्यावर असलेले काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सोमवारी रेल्वेने प्रवास केला. त्यांनी बिलासपूर ते रायपूर असा 117 किलोमीटरचा प्रवास केला. यावेळी त्यांनी प्रवाशांशी त्यांच्या समस्याही जाणून घेतल्या. राहुलने ट्रेनमध्ये उपस्थित महिला हॉकीपटूंशी चर्चा केली. तसेच त्यांचे प्रशिक्षण आणि त्यांना मिळणाऱ्या सुविधांबाबत विचारणा केली.**



### 414 विकास कामे रहिवाशांना समर्पित

» तत्पूर्वी, खासदार राहुल गांधी आणि मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी 'आवास न्याय संमेलना' त 669 कोटी 69 लाख रुपयांची 414 विकास कामे परिसरातील रहिवाशांना समर्पित केली. यामध्ये 195 कोटी 50 लाख रुपये खर्चाच्या 247 कामांची पायाभरणी आणि 474 कोटी 18 लाख रुपये खर्चाच्या 167 कामांच्या उद्घाटनाचा समावेश आहे.

बिलासपूरमध्ये आयोजित काँग्रेस निवासस्थानी परिषदेत सहभागी झाल्यानंतर राहुल बिलासपूरहून इंटरसिटी एक्सप्रेसच्या स्लीपर कोचमध्ये चढले. सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास ते रायपूर रेल्वे स्थानकावर पोहोचले. यावेळी त्यांच्यासोबत ट्रेनमध्ये मुख्यमंत्री भूपेश बघेल आणि प्रभारी कुमारी सेलजाही होत्या. राहुल यांनी एका सामान्य प्रवाशाप्रमाणे ट्रेनमध्ये प्रवास केला आणि फिरून लोकांना भेटून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी चॉकलेट्स आणि चिप्सही खरेदी केल्या. राहुल गांधी यांचा रायपूर ते बिलासपूर हा प्रवासही रेल्वेनेच ठरला होता. मात्र ट्रेनला उशीर झाल्याने त्यांचा प्रवास पुढे ढकलण्यात आला. त्या हॉकीपटूंशी संवाद साधला ज्यांच्याशी राहुल गांधी ट्रेन दरम्यान भेटले होते. राहुल गांधींनी महिला खेळाडूला विचारले, तुम्ही कोणता खेळ खेळता? तर खेळाडूने सांगितले की मी हॉकी खेळते. ती कोणत्या पोझिशनवर खेळते, असा सवाल राहुल गांधी यांनी केला. तेव्हा खेळाडू म्हणाली, मी मध्यवर्ती स्थितीत खेळते. या खेळाडूंनी मैदानात टर्फची मागणीही केली होती. तत्पूर्वी, बिलासपूर येथील सभेत राहुल म्हणाले की, मोदीजी अदानी-अंबानींच्या विमानात प्रवास करतात, हे नाते काय? मी या नात्याबद्दल विचारले तेव्हा मला उत्तर मिळाले. माझे लोकसभेचे सदस्यत्व रद्द करण्यात आले. बिलासपूरच्या तखतपूर येथील गृहनिर्माण परिषदेच्या मंचावरून राहुल गांधींनी केंद्रावर जोरदार निशाणा साधला. राहुल म्हणाले की, मी संसदेत विचारले की, संरक्षणात, विमानतळावर, शेतकऱ्यांच्या काळ्या कायद्यात अदानींना फायदा देण्याचा प्रयत्न झाला. असे का घडले? हे फायदे कोणत्या संबंधात दिले गेले? राहुल म्हणाले, भारत सरकार हे आमदार आणि खासदार चालवत नाहीत तर कॅबिनेट सचिव आणि सचिव चालवतात. 90 सचिव आहेत, ते योजना आखतात. पैसे कुठे जाणार ते ते ठरवतात.

# हिंडन :दहशतवाद्यांचे अड्डे' ड्रोनने नष्ट केले!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

गाझियाबाद येथील हवाई दलाच्या हिंडनएअरबेसवर सोमवारी भारताच्या ड्रोन शक्तीचे प्रदर्शन करण्यात आले. देशभरातील कंपन्यांनी त्यांच्या हायटेक ड्रोनचे प्रदर्शन केले. यावेळी काही ड्रोनने आकाशातील संशयास्पद वस्तू ताब्यात घेतल्या, तर काही ड्रोनने दहशतवाद्यांच्या डमी अड्ड्यांवर बॉम्ब टाकून त्या नष्ट केल्या. इतकंच नाही तर इंडिया ड्रोन शक्ती शोच्या सुरुवातीला दोन संशयित दहशतवादी एअरबेसवर प्रतिकात्मकपणे दिसले होते. प्रथम एका ड्रोनने त्याचे छायाचित्र टिपले. तर लगेच तेथे पोहोचलेल्या इतर ड्रोनने स्वयंचलित शस्त्रांनी गोळीबार करून त्यांना हुसकावून लावले. याशिवाय शोमध्ये 50 प्रकारचे ड्रोन दाखवण्यात आले होते. त्यात संरक्षण, कृषी, अग्निशमन, आरोग्य आणि सर्वेक्षण क्षेत्राशी संबंधित ड्रोनही दाखवण्यात आले. कार्यक्रमादरम्यान संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, हवाई दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल व्हीआर चौधरी कार्यक्रमस्थळी उपस्थित होते. C-295 विमान संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी हवाई दल प्रमुख व्हीआर चौधरी यांच्याकडे सुपूर्द केले. औपचारिकपणे चाव्या देण्यात आल्या. त्यांनी रोलीचा वापर करून विमानावर स्वस्तिक बनवले.संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि हवाई दल प्रमुख व्हीआर चौधरी सी 295 विमानाच्या आत गेले. 26 सप्टेंबरपर्यंत चालणाऱ्या या ड्रोन शोचे आयोजन भारतीय हवाई दल आणि ड्रोन फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने केले जात आहे. देशभरातील 75 हून अधिक ड्रोन स्टार्टअप्स आणि कॉर्पोरेट्स यात सहभागी झाले आहेत. नवी दिल्ली येथे भारत ड्रोन शक्ती-2022चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हा कार्यक्रम दिल्लीला लागून असलेल्या गाझियाबाद येथील हिंडन एअरबेसवर होत आहे. या कार्यक्रमाला देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि हवाई दल प्रमुख व्हीआर चौधरी उपस्थित राहणार आहेत. या दोन दिवसांत ड्रोन उड्डाण, प्रात्यक्षिक, पॅनेल चर्चा, उत्पादनांचे लाँचिंग आदी कार्यक्रम होणार आहेत.

# गणेशोत्सवाची परंपरा!



गणेश चतुर्थीला गणेशाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. श्री गणेशाच्या प्रतिष्ठापना विधीमध्ये गणपतीची मूर्तीचे आवाहन, स्नान, अभिषेक, वस्त्र, चंदन, फुल, पत्री, नैवेद्य इत्यादी सोळा उपचारांनी पूजा केली जाते. यामध्ये त्याला विविध एकवीस पत्री अर्पण केल्या जातात. त्यामध्ये फराळ आगळा यांची २१ जोडी गणपतीला अर्पण केली जाते. पावसाळ्यात या सर्व पत्रे सामान्यता उपलब्ध असतात आणि प्रत्येक वनस्पतीला काही औषधी गुणधर्म सुद्धा आहेत. मूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी तिची उत्तर पूजा करतात. मूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी काही मंत्रही म्हणतात. जिथे गणपती बसवायचा असतो, तेथे मखर किंवा विविध साधनांनी सजावट केली जाते, लाइटिंग लावली जाते, गणपतीला वेगवेगळ्या पदार्थांचा नैवेद्य दररोज दिला जातो. लाडू व मोदक यांचा भोग लावल्या जातो. तसेच गणपतीची नावे वेगवेगळी आहेत. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गणेश उत्सव साजरा केला जातो. एका मान्यतेनुसार श्रीगणेशाच्या अवतारांपैकी गणेश यांचा जन्म व भाद्रपद शुद्ध चतुर्थीला महादेव शिवशंकरांनी कैलास पर्वतावर भाद्रपद शुद्ध चतुर्थीला याच दिवशी जन्मोत्सव साजरा केला. श्रीगणेश यांनी शिंदूर दैत्यावर विजय मिळवला. तो दिवस भाद्रपद शुद्ध चतुर्थी हा होता. त्यामुळे हा उत्सव साजरा करण्यात आला ती पूर्व परंपरा आजही पाळली जाते. चतुर्थी श्री गणेशाची अत्यंत प्रिय तिथी आहे. चतुर्थी म्हणजे जागृती स्वप्न सुशुप्ती या पलिकडील अवस्था आहे. गणेश चतुर्थीचा उत्सव सार्वजनिक रित्या शनिवार वाड्यात सुरू केला गेला. व हा मोठ्या श्रद्धेने व उत्साहाने साजरा केला जातो.

# गणेश उत्सवविषयी पौराणिक कथा!

शिवपुराणाध्ये गणपती विषयीचा एक उल्लेख आढळतो. त्यामध्ये पार्वती एके दिवशी नंदीला द्वारपाल म्हणून नियुक्त करून स्नान करण्यास गेलीअसता यावेळी शंकर तेथे आले. त्यांनी नंदीस झुगारून न्हाणीघरात प्रवेश केला. यामुळे पार्वती अपमानित व रागाने क्षुब्ध झाली. शेवटी सखी जया व विजया यांच्या सल्ल्याने चिखलापासून एका सुंदर पुत्राची मूर्ती तिने निर्माण केली व त्यात प्राण फुंकले या पुत्रास तिने स्वतःचा अनुचर म्हणून नेमले नंतर एकेदिवशी या कुमार मुलास दारी नेमून पार्वती स्नानास गेली असता, शंकर तेथे उपस्थित झाले. यावेळी त्या कुमाराने शंकरास अडवले. पहिल्यांदा कुमारसोबत त्यांचा वाद व नंतर पार्वतीच्या मनातील रागाप्रमाणे युद्ध झाले. शिव व सर्व देवतागण या लढाईत पराजित झाले. तेव्हा नारदाच्या सल्ल्याने विष्णूद्वारे कुमारास मोहित करून शंकरांनी त्याचे मुंडके उडविले ही वार्ता ऐकून पार्वतीने क्रुद्ध होऊन सृष्टी नष्ट करण्यास प्रारंभ केला. नारद व देवगणांनी पार्वतीला शांत केले. तेव्हा पार्वतीने तिच्या पुत्राच्या पुनर्जीवनाची मागणी केली व तिचा पुत्र सगळ्यांना पूज्य व्हावा, अशी इच्छा व्यक्त केली. शंकरांनी त्यास होकार दिला. परंतु कुमाराचे मस्तक कोठेही न मिळाल्याने त्यांनी गणांस उत्तर दिशेस पाठवले व प्रथम जो प्राणी दिसेल त्याचे मस्तक आणण्याची आज्ञा केली. एका हत्तीचे मस्तक घेऊन उपस्थित झाले. देवगणांनी ह्या मुंडक्याच्या साहाय्याने कुमारास जिवंत केले. तर प्रांत शंकरांनी या मुलास स्वपुत्र म्हणून स्वीकारले व देवगण यांच्या आशिर्वादाने हा मुलगा पूज्य झाला व श्री गणेश नावाने प्रसिद्ध झाला. तसेच आणखीन एक गणपती विषयी अख्यायिका आहे. एकदा गणपती चतुर्थीचे स्वतःचे आवडीचे मोदक खाऊन उंदराच्या पाठीवरून जात होता. वाटेत साप दिसल्याने उंदिर भयाने कापू लागला. यामुळे गणपती उंदराच्या पाठीवरून खाली पडला व त्याचे पोट फाटून मोदक बाहेर पडले. गणपतीने ते सारे मोदक पुनः पोटात टाकले व पोटावर साप बांधला. हे दृश्य पाहून आकाशातील चंद्र हसू लागला. म्हणून तुझ्या रूपास चतुर्थीस कोणी दर्शन घेणार नाही. जो तुझे रूप पाहिल त्याचावर संकट येईल. असा शाप चंद्राला दिला, अशीही एक आख्यायिका प्रसिद्ध आहे.



# एशियाडमध्ये भारताची सुवर्णभरारी!

## » एशियाडमध्ये भारतीय महिला क्रिकेट संघाने रचला इतिहास

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**आज १९व्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला क्रिकेट संघाचा अंतिम फेरीत श्रीलंकेशी सामना झाला. हा सामना जिंकून टीम इंडियाने प्रथमच सुवर्णपदक जिंकले आहे. भारताने पहिल्या उपांत्य फेरीत बांगलादेशचा आठ गडी राखून पराभव केला होता, तर दुसऱ्या उपांत्य फेरीत श्रीलंकेने गतविजेत्या पाकिस्तानचा सहा गडी राखून पराभव करून अंतिम फेरीचे तिकीट निश्चित केले होते. कांस्यपदकाच्या लढतीत बांगलादेश संघाने पाकिस्तानचा पराभव केला. सुवर्णपदकाच्या लढतीत भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.**



११७ धावांच्या लक्ष्याला प्रत्युत्तर देताना श्रीलंकेचा संघ आठ गड्यांच्या मोबदल्यात ९७ धावाच करू शकला.

हांगझाऊ येथे सुरू असलेल्या १९व्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला क्रिकेट संघाने सुवर्णपदक पटकावले आहे. सुवर्णपदकाच्या अंतिम सामन्यात भारताने श्रीलंकेसमोर ११७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. भारताने २० षटकांत सात गडी गमावून ११६ धावा केल्या. स्मृती मंधानाने सर्वाधिक ४६ धावांची खेळी खेळली. तर जेमिमाह रॉड्रिग्जने ४२ धावा केल्या.

प्रत्युत्तरात श्रीलंकेचा संघ २० षटकांत ८ गडी गमावून ९७ धावाच करू शकला. अशा प्रकारे टीम इंडियाने अंतिम सामना १९ धावांनी जिंकला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. शफाली वर्मा १५ चेंडूत ९ धावा करून बाद झाली. यानंतर स्मृतीने जेमिमासोबत दुसऱ्या विकेटसाठी ७३ धावांची भागीदारी केली. रणवीराने ही भागीदारी तोडली. त्याने मंधानाला बाद केले. मंधानाने ४५ चेंडूंत ४ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ४६ धावांची खेळी केली. त्याचवेळी ऋचा घोष ९ धावा करून बाद झाली आणि कर्णधार हरमनप्रीत कौर २ धावा करून बाद झाली आणि पूजा वस्त्राकर दोन धावा करून बाद झाली. जेमिमाह रॉड्रिग्जने ४० चेंडूंत ५ चौकारांच्या मदतीने ४२ धावांची खेळी केली. दीप्ती आणि अमनजोत प्रत्येकी एक धाव काढत नाबाद राहिले. श्रीलंकेकडून उदेशिका प्रबोधनी, सुगंधिका कुमारी आणि इनोका रणवीराने प्रत्येकी दोन गडी बाद केले.

### भारताची दमदार सुरुवात

» प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाला मंधाना आणि रॉड्रिग्ज यांनी शानदार सुरुवात करून दिली. 16 धावांवर शेफालीची विकेट गमावल्यानंतर मंधानाने रॉड्रिग्जसोबत अर्धशतकी भागीदारी केली. टीम इंडियाने पहिल्या 6 षटकात एका विकेटवर 35 धावा केल्या.

### भारताची दमदार सुरुवात

» सुवर्णपदकाच्या लढतीत भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. 16 धावांवर शेफालीची विकेट गमावल्यानंतर मंधाना आणि रॉड्रिग्स यांनी 73 धावांची भागीदारी केली. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी 67 चेंडूत 73 धावांची भागीदारी केली. ही भागीदारी इनोका रणवीराने मोडली.

# भारताने ऑस्ट्रेलियाला हरवले!

## » वनडेतील सहावे शतक झळकावले

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**टीम इंडियाने वनडे मालिकेतील दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा 99 धावांनी पराभव केला. या विजयासह भारताने 3 सामन्यांच्या मालिकेत 2-0 अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. एवढेच नाही तर इंदूरच्या होळकर स्टेडियमवर संघाने आपला विजयाचा विक्रम कायम ठेवला आहे. या मैदानावर भारतीय संघाचा हा सलग 7 वा विजय आहे. संघाने येथे फक्त 7 सामने खेळले आहेत.**



### श्रेयस अय्यरचे 88 चेंडूत शतक

» राहुलने अर्धशतकी खेळी खेळली. त्याने त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीतील 15 वे अर्धशतक झळकावले. राहुल 52 धावा करून बाद झाला. त्याने 38 चेंडूत 136.84 च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या. राहुलच्या खेळीत 3 चौकार आणि 3 षटकारांचा समावेश होता. तिसऱ्या क्रमांकावर खेळायला आलेल्या श्रेयस अय्यरने वनडे कारकिर्दीतील तिसरे शतक झळकावले. तो 90 चेंडूत 105 धावा करून बाद झाला. अय्यरच्या खेळीत 11 चौकार आणि 3 षटकारांचा समावेश होता.

आज ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करताना 50 षटकांत 5 बाद 399 धावा केल्या. 400 धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ 28.2 षटकांत 217 धावांवर सर्वबाद झाला. मालिकेतील दुसऱ्या सामन्यालाही पावसाचा फटका बसला. या सामन्याच्या दोन्ही डावांमध्ये पाऊस पडला. भारतीय डावात पहिल्यांदा पाऊस पडला. त्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या डावातही पावसामुळे सामना थांबवावा लागला. अशा स्थितीत पंचांनी ऑस्ट्रेलियाला सुधारित लक्ष्य दिले. इंदूरच्या होळकर स्टेडियमवर प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने 50 षटकांत 5 गडी गमावून 399 धावा केल्या आणि कांगारूंना 400 धावांचे लक्ष्य दिले. ऑस्ट्रेलियाविरुद्ध वनडे क्रिकेटमधली ही भारताची सर्वात मोठी धावसंख्या आहे. यापूर्वी भारतीय संघाने 2013 मध्ये बेंगळुरूमध्ये 383 धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी निवडली. भारतीय सलामीवीर शुभमन गिल (104 धावा) आणि श्रेयस अय्यर (105 धावा) यांनी शतकी खेळी खेळली, तर केएल राहुल आणि सूर्यकुमार यादव यांनी अर्धशतके झळकावली. ऑस्ट्रेलियन संघाकडून कॅमेरून ग्रीनने 2 बळी घेतले. जोश हेझलवूड, सीन ॲबॉट आणि ॲडम झम्पा यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. सूर्यकुमार यादवने सलग दुसऱ्या सामन्यात अर्धशतक ठोकले.

# संघ निवडीवर वीरेंद्र सेहवागचे मोठे विधान

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील वनडे मालिकेतील तिसरा सामना २७ सप्टेंबर रोजी राजकोट येथे होणार आहे. टीम इंडियाने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. तिसऱ्या सामन्यातही विजय मिळवत कांगारूंना व्हाईटवॉश देण्याचा भारतीय संघाचा इरादा आहे. तिसऱ्या सामन्यात रोहित शर्मा आणि राहुल द्रविड यांच्यासमोर प्लेईंग-११ निवडण्याची खूप मोठी डोकेदुखी ठरणार आहे. तिसऱ्या सामन्यापूर्वी भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, इंदोरमध्ये शतक झळकावणारा शुबमन गिल तिसरा सामना खेळणार नाही. गिलबरोबरच शार्दुल ठाकूरलाही तिसऱ्या सामन्यासाठी विश्रांती देण्यात आली असून दोन्ही खेळाडू आपापल्या घरी गेले आहेत. याशिवाय अक्षर पटेलही वेळेत तंदुरुस्त होऊ शकलेला नाही. त्याच्याऐवजी अश्विनला संधी दिली जाईल. अशा परिस्थितीत अक्षर विश्वचषक खेळण्यावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. टीम इंडियाने सामन्यादरम्यान ऑस्ट्रेलियाला ४०० धावांचे आव्हान दिले होते. ही धावसंख्या उभारताना यावेळी श्रेयस अय्यर आणि शुबमन गिल यांनी खणखणीत शतके झळकावलीत. दुसरीकडे, के.एल. राहुल आणि सूर्यकुमार यादव यांनीही विस्फोटक खेळी केली. या खेळाडूंच्या विजयामुळे भारतीय संघाचा माजी दिग्गज फलंदाज वीरेंद्र सेहवाग याच्या पोस्ट सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहेत. त्याने शुबमन, श्रेयसपासून सूर्यापर्यंत सर्वांचे कौतुक केले आहे. भारताने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाचा ९९ धावांनी पराभव केला. या सामन्यात सलामीवीर शुबमन गिलने ९७ चेंडूत १०४ धावा केल्या.